# हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Associate Sponsor riso 100% Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon



## ऐतिहासिक मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊया

औरंगाबादनगरीत महामॅरेथॉनचा मेगा इव्हेंट होत आहे. आरोग्याचा संदेश देण्याबरोबरच ॲथेलेटिक्स खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी होणारा हा उपक्रम औरंगाबादची ओळख देशभरात नेणार आहे. आपल्या शहराचा नावलौकिक वाढविण्यासाठी या उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. आपण स्वत: आणि फॉर्च्युन फूड लिमिटेडचे सर्व कर्मचारी या उपक्रमाचा भाग होणार आहोत. आरोग्य संवर्धनाची जागरूकता शहरात वाढत आहे. त्यास या उपक्रमामुळे अधिक गती येणार आहे.

**- शैलेश गुप्ता,** संचालक, फॉर्च्युन फूड लिमिटेड



## 'स्पोर्टिंग कल्चर' निर्माण केले

लोकमत महामॅरेथॉन ही स्पर्धा आता मराठवाड्यातील सगळ्यात मोठी 'क्रीडा स्पर्धा' बनली आहे. संपूर्ण शहराला धावायला लावणाऱ्या या स्पर्धेचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. शहरामध्ये 'स्पोर्टिंग कल्चर' निर्माण करण्यात या स्पर्धेचा खूप मोठा सहभाग राहिलेला आहे. त्यामुळे शहरात एक चांगला सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या 'लोकमत' समूहाला शुभेच्छा.

**- राहुल पगारिया,** संचालक, पगारिया ऑटो



**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स, औरंगाबाद -** (डावीकडून) दीपक गरकल, रोहित सूर्यवंशी, डी. बी. अग्रवाल, स्वप्नील श्रॉफ, सुनील भाले (चेअरमन), लक्ष्मीकांत सुर्वे, ऋषिकेश शिरपेवार, सुधीर कुलकर्णी, आनंद वीरकर, शैलेंद्र जैस्वाल, नीरज बडजाते (उपाध्यक्ष), संजय पाठे (कोषाध्यक्ष), पूजा कपाडिया, अमृता दौलताबादकर.



**बँक ऑफ बडोदा ग्रुप-** (डावीकडून) फरहाद शेख, राहुल कवडे, संचितानंद मिश्रा, उत्सव हेळंबकर, सावनकुमार, पवन सोनवणे, समद खान, आनंद पासे, दीपा झांगियानी, रंजना लेले, निहारिका अक्षिंतला, अनुजा केंद्रे, छाया चौरे, मनीषा घोडेकर, (खाली बसलेले, डावीकडून) अमोल महाजन, परितोष पवार, साहिल आर्य, रोहित कांबळे, राहुल कोटांगळे, तानाजी ढोलदार, अमृता मगर, सरिता भिसे.

T-Shirt Partner | Co-Sponsors | In Association with
ANAND CONSTRUCTION | AURACON INFRA | CORE CONSULTANTS | ZAMBAD BUILDERS & DEVELOPERS | PARK GROUP | SANDIP UNIVERSITY | PRIDE CENTURY | First Idea Education | SARA | WOCKHARDT | LIFE WINS | varroc EXCELLENCE
Food & Beverage Partner: Frut-X Fortune Foods | Official Energy Drink Partner: Enerzal | Sporting Accommodation Partner: istay sporty | Health & Drink Partner: Vedika Care n Cure | Outdoor Partner: abhishek | Healthcare Partners: VIDEOCON SETH NANDLAL DHOOT HOSPITAL, CIIGMA HOSPITAL | Race Management: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Water Partner: COOLZY
Supported by | Banking Partners: बँक ऑफ बड़ौदा Bank of Baroda, Bank of India | Sound Partner: S.S.PRO, Northern Pro Lights | Power Partner: PAGARIYA AUTO | Fitness Partner: ULTIMATE FITNESS | Mall Partner: PROZONE | Waste Management Partner | Sports Partners

**औरंगाबादवर अन्याय:** मुंबई, नाशिक आणि नागपूरचा समावेश; कृषी पणन मंडळाला सूचना

# टर्मिनल मार्केटमधून शहर वगळले

प्रशांत तेलवाडकर | लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : आघाडी** सरकारच्या काळात मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाधववाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात टर्मिनल मार्केट उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, युतीच्या सरकारने औरंगाबादला वगळून मुंबई, नाशिक व नागपूर येथे टर्मिनल मार्केट उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाला प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जाधववाडीतील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात ५० एकर जागा राज्य कृषी पणन मंडळाच्या ताब्यात आहे. या जागेवर टर्मिनल मार्केट उभारण्याचा निर्णय आघाडी सरकारच्या काळात घेण्यात आला होता. तिथे फळ-भाज्यांवर प्रक्रिया करून त्या देशात व विदेशात पाठविण्याची योजना होती.

जिल्ह्यात मक्याचे क्षेत्र लक्षात घेता त्या जागेवर 'मका हब' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता; पण निर्णय हवेतच विरळला. येथील त्या ५० एकर जागेचा वाद सध्या न्यायालयात सुरू आहे. नुकतेच मुंबई येथे सहकार व पणनमंत्री सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पणन मंडळाच्या संचालकांची बैठक पार पडली. यात मुंबई, नाशिक व नागपूर येथे टर्मिनल मार्केट उभारण्याचा निर्णय झाला.

यासाठी प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारी कृषी पणन मंडळावर टाकण्यात आली. तो प्रस्ताव तयार करून मंडळाने शासनास द्यावा. त्यानुसार पुढील कार्यवाही राज्य शासन करेल, असे बैठकीत ठरविण्यात आले. यामुळे आता जाधववाडीत टर्मिनल मार्केट उभारणीसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

यासंदर्भात बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे यांनी सांगितले की,बाजार समितीला विकास कामासाठी आता त्या ५० एकर जमिनीची आवश्यकता आहे. कृषी पणन मंडळाच्या ताब्यातील जमीन परत मिळावी यासाठीचा प्रस्ताव आम्ही पणन मंडळाकडे पाठविला आहे. यामुळे पणनमंत्र्यांच्या बैठकीत टर्मिनल मार्केटसाठी औरंगाबादचा उल्लेख करण्यात आला नसावा.

### ७ वर्षांपासून ५० एकर जागा पडून

◆ बँकेचे कर्ज परतफेड न केल्याने बाजार समितीवर जागा विकण्याची वेळ आली होती; पण २०१० मध्ये कृषी पणन मंडळाने बँकेची रक्कम देऊन बाजार समितीचे नाक वाचविले. त्यावेळेस २५ कोटी ५० लाख रुपये पणन मंडळाने दिले होते. त्या बदल्यात ५० एकर जागेचा ताबा मंडळाने घेतला. त्यापैकी १४ कोटी रुपयेच मंडळाने दिले. बाकीची रक्कम अजूनही दिली नाही. त्या जागेचा विकासही केला नाही.

**-हरीश पवार,** माजी संचालक



# ४० आरोग्य कर्मचाऱ्यांना अनेक वर्षांनंतर लाभ

**जि.प. :** ४१ आरोग्यसेविकांना पदोन्नती

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : तब्बल** सात ते आठ वर्षांच्या प्रचंड कालखंडानंतर जिल्हा परिषदेच्या ४१ आरोग्यसेविकांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्याचा निर्णय जिल्हा आरोग्य विभागाने घेतला आहे.

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्याची सेवा देणाऱ्या आरोग्यसेविकांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी आरोग्य कर्मचारी संघटनेने सातत्याने आंदोलने केली. आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा देवयानी पाटील डोणगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिरसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजूषा कापसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विवेक खतगावकर यांनी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बी. एफ. बैनाडे, कार्यकारी अध्यक्षा प्रमिला कुंभारे, सचिव प्रकाश बिऱ्हाडे व पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून सदरील प्रश्न सोडविण्यासाठीचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आरोग्य विभागाने ५८ पैकी पात्र ठरलेल्या ४१ आरोग्यसेविकांना कालबद्ध पदोन्नतीचे आदेश देण्याचा निर्णय घेतला. यातील १७ आरोग्यसेविकांपैकी काहींनी जात वैधता प्रमाणपत्र, तर काहींनी सेवा खंड क्षमापित प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे त्यांना प्रशासनाने अपात्र ठरवले. सोमवारी पात्र आरोग्यसेविकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचे आदेश जारी केले जातील, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. खतगावकर यांनी सांगितले.

**दुसऱ्या टप्प्यात २५० जणांना लाभ**

पहिल्या टप्प्यात १२ वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या ४१ आरोग्यसेविकांना कालबद्ध पदोन्नतीची वेतनश्रेणी देण्याचा निर्णय घेण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात २४ वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या २५० कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात येणार आहे. जे कर्मचारी पुरेशा रिक्त जागांअभावी थेट पदोन्नतीपासून वंचित राहतात, अशा कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ दिला जातो, असे डॉ. खतगावकर यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री निधीसाठी मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : महाराष्ट्र** कामगार कल्याण मंडळाने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १ लाख रुपयांची मदत केली आहे. बुधवारी भारतीय बहुजन कामगार संघ मराठवाडातर्फे त्या मदतीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द करण्यात आला.

यावेळी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय केणेकर, संघटनेचे अध्यक्ष नितीन निंभोरकर, मोर्चाचे प्रदेश सचिव संजय जोरले यांची उपस्थिती होती. कामगार कल्याण मंडळातील कर्मचाऱ्यांना २००६-१२ पर्यंतची थकबाकी न देण्याच्या अटीवर सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला. यासाठी केणेकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून थकबाकी मिळवून दिली. ८२ कर्मचाऱ्यांना रोख स्वरुपात थकबाकी मिळाली.

त्यानिमित्त समाजाप्रती बांधिलकीच्या भावनेने कर्मचारी संघटनेने शासन सहायता निधीला मदत केली. याप्रसंगी प्रकाश गायकवाड, संदीप कुलकर्णी, भगवान जरारे, संग्राम साने, शिवाजी वाघ, जिज्ञेश पाटील, श्यामकांत पाटील, आरेफ शेख, नितीन पाटील, सलीम पठाण आदींची उपस्थिती होती.

# शिवछत्रपती' मध्ये कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : शिवछत्रपती** महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. अनिल घुले यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. घुले यांनी उद्घाटनानंतर आयपीआरचा इतिहास, गरज, प्रकार, कायद्यातील तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत डॉ. भाग्यश्री परांजपे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. पी. व्ही. आष्टेकर, प्रा. संजय राऊत, प्रा. आशिष वाघुम्बरे प्रा. भाग्यश्री ढोले, प्रा. नितीन गायकवाड उपस्थित होते.




# ऑक्सिजन सिलिंडरच्या आवाजाने घाटीत गोंधळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : शासकीय** वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (घाटी) वॉर्ड २४ मध्ये शनिवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास ऑक्सिजन सिलिंडर बदलताना आवाज झाला आणि स्फोटाच्या अफवेने एकच गोंधळ उडाला. यावेळी नातेवाईकांनी दाखल बालकांना घेऊन वॉर्डाबाहेर पळ काढला. पाहता पाहता घाटीत ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट झाल्याची अफवा पसरली.

लहान मुलांचे वॉर्ड क्रमांक २४ मध्ये दुपारी १२ वाजेच्या सुमारास एका चिमुकल्याच्या व्हेंटिलेटरचे ऑक्सिजन सिलिंडर बदलले जात होते. सिलिंडर बदलताना थोडाफार आवाज होतो; परंतु यावेळी हा आवाज काहीसा मोठा असल्याचे समजते. शिवाय आजूबाजूच्या रुग्णांच्या नातेवाईकांपैकी काहींनी प्रथमच असा आवाज ऐकला. त्यामुळे स्फोटाची अफवा पसरली. यावेळी एका नातेवाईकाने स्फोट झाल्याची आरडाओरड करीत बाहेर धाव घेतली. हे पाहून इतरांनीही त्याच्यापाठोपाठ धाव घेतली आणि एकच गोंधळ उडाला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. भारत सोनवणे, डॉ. राहुल पांढरे, डॉ. अनिल पुंगळे आदींनी रुग्णांची समजूत काढली. घाटीतील मेडिसिन विभागात सेंट्रल ऑक्सिजन सिस्टिम आहे. येथे एका टँकमधून अतिदक्षता व आयसीसीयू, 'एमआयसीयू'ला ऑक्सिजन पुरवठा केला जातो. सर्जिकल इमारतीमधील ऑपरेशन थिएटरमध्ये ऑक्सिजन पुरवठा करण्यासाठी एक टँक आहे. तिथे करण्यात येणाऱ्या तांत्रिक कामांमुळे आवाज येण्याचा प्रकार घडला. थेट लिक्विड ऑक्सिजनच्या टँकमधून पुरवठा झाल्यास ही कसरत कमी होईल, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.



घाटीतील वॉर्ड क्रमांक २४ मध्ये पाहणी करताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. भारत सोनवणे, डॉ. अनिल पुंगळे आदी.

# 'ऐतिहासिक दरवाजे; दोन आठवड्यांत शपथपत्र दाखल करा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : शहरातील** खाम नदीवरील मकाई, महेमूद व बारापुल्ला या ऐतिहासिक दरवाजांसह त्यालगतच्या पुलांच्या संवर्धनासंदर्भात औरंगाबाद खंडपीठाने यापूर्वीच्या सुनावणीत आदेश दिले होते. त्याची अंमलबजावणी करावी व दोन आठवड्यांत शपथपत्र दाखल करावे, असे निर्देश न्या. एस. व्ही. गंगापूरवाला व न्या. एस. एम. गव्हाणे यांच्या खंडपीठाने दिले आहेत.

जुन्या पुलांचे संवर्धन करून दुरुस्तीसाठी राज्य शासनाने निधी द्यावा, अशी विनंती करणारी याचिका मनपाचे माजी सभापती इकबालसिंग गिल यांनी दाखल केली.

राज्य शासनाने पुलांच्या बांधकामासाठी निधी तात्काळ मंजूर करण्याची विनंती याचिकेत करण्यात आली आहे. सुनावणीअंती आदेशाची अंमलबजावणी करावी व दोन आठवड्यांत शपथपत्र दाखल करावे, असे निर्देश खंडपीठाने दिले.

**कार्यशाळा :** अजिंठा, वेरूळ संवर्धन आणि पर्यटन विकास प्रकल्प महत्त्वपूर्ण

# पर्यटकांसाठी सर्वांनी स्वागतशील असावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : पर्यटकांना** स्वागतशील, सुखद अनुभव देण्यासाठी स्थानिक प्रशासन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्व विभाग यांची सक्रिय भूमिका आहे. शिवाय पाणी, वीज, रस्ते, वाहतूक, खरेदी, खाद्य सुविधा दर्जेदार उपलब्ध होणे, याबाबीदेखील महत्त्वाच्या असल्याचे मत एका पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित कार्यशाळेत व्यक्त करण्यात आले.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी आणि महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे आयोजित अजिंठा-एलोरा कॉन्झर्व्हेशन ॲन्ड टुरीझम डेव्हलपमेन्ट या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या अंमलबजावणीबाबत कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते झाले. यावेळी एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक विजय वाघमारे, पोलीस अधीक्षक आरती सिंह, विनीत सरीन, जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीचे नारी हीतो यांच्यासह पुरातत्व आणि पर्यटन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जागतिक वारसा असलेल्या अजिंठा-वेरूळ पर्यटन स्थळांसोबत एकंदरीत औरंगाबादच्या पर्यटन विकासाच्या गतिमान वाटचालीसाठी १९९२ पासून सुरू असलेला अजिंठा-वेरूळ संवर्धन आणि पर्यटन विकास प्रकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर म्हणाले. औरंगाबाद हा पर्यटन आणि औद्योगिक विकासाचा राज्यातील उल्लेखनीय जिल्हा आहे. त्याचा गतिमान विकास करण्यामध्ये अजिंठा, वेरूळ संवर्धन आणि पर्यटन विकास प्रकल्पांतर्गत १९९२ ते २००२ या पहिल्या टप्प्यात उल्लेखनीय काम झाले. २००२ नंतरच्या पुढील काळात त्याठिकाणी उभारण्यात आलेल्या अजिंठा अभ्यागत केंद्र आणि वेरूळ अभ्यागत केंद्रामुळे देशी-परदेशी पर्यटकांना सुविधा मिळत आहेत, असेही भापकर म्हणाले.

पर्यटकांच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्याची, रस्त्यांची, देशाची, प्रतिमा तयार होत असते. यादृष्टीने आपण सर्वांनी गुणवत्तापूर्ण सेवा देण्याच्या उद्देशाने एकत्रित प्रयत्न करून औरंगाबाद पर्यटन स्थळांचे जतन व संवर्धन करावे, असे आवाहन यावेळी एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक वाघमारे यांनी केले.

### ...तर पर्यटकांचे आकर्षण वाढेल

दौलताबाद, गवताळा, पितळखोरा या पर्यटन स्थळांसाठी दळणवळणात सुधारणा झालेली आहे. जिल्ह्यातील लेणी परिसरात परदेशी व इतर राज्यांतील पर्यटकांची संख्या ही जास्त आहे. तिथे कृषिपर्यटन ही संकल्पना राबवून स्थानिक लोकांना रोजगाराची संधी देण्याबाबत काही नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत विचार सुरु आहेत. त्याचप्रमाणे पर्यटकांना या ऐतिहासिक ठिकाणांची अधिकृत माहिती योग्य पद्धतीने दिल्यास निश्चितच पर्यटकांचा या पर्यटन स्थळांबाबतचा आदर, आकर्षण वाढेल, त्या दृष्टीने प्रशिक्षित गाइड वेरूळ, अजिंठा या ठिकाणी अधिक संख्येने उपलब्ध करुन देण्याबाबतही लवकरच कार्यवाही करण्यात येईल.



